पदविकाधारक कनिष्ठ अभियंत्यांना
[स्थापत्य] शाखा अभियंता [वर्ग-२]
चा दर्जा व सुधारित वेतनश्रेणी देण्याबाबत.

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे [ पूर्व ], मुंबई ४०००५१**
**आदेश क्र.प्राधि/शा.अ.द./२०२३/ 1476 /प्र.७**
**दिनांक :- 18 MAY 2023**

ITC Cell,
M. H. & A. D. Authority
Inward No.: 1179
Date: 22.05.2023

**संदर्भ** - १.गृहनिर्माण विभागाची दि.१८.१०.२०१३ रोजीची अधिसुचना
२. दि.२१.०३.२०२३ रोजीची विभागीय पदोन्नती समितीची बैठक

## आ दे श

शाखा अभियंता या संवर्गातील सेवाप्रवेश नियम दि. ०३.१२.२०२० रोजी अंतिम करण्यात आले असून, शासनमान्य विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकीमधील ३वर्ष पदविका किंवा महाराष्ट्र शासनाने तिच्याशी समकक्ष म्हणून मान्यता दिलेली अर्हता धारण करणारी व विभागात नियमित आस्थापनेवर ५ वर्षाची कनिष्ठ अभियंता म्हणून अखंड सेवा केलेली व्यक्ती किंवा शासनमान्य विद्यापीठाची २ वर्ष पदविका किंवा महाराष्ट्र शासनाने तिच्याशी समकक्ष म्हणून मान्यता दिलेली अर्हता धारण करणारी व्यक्ती व विभागात नियमित आस्थापनेवर ७ वर्षाची कनिष्ठ अभियंता म्हणून अखंड सेवा केलेली व्यक्ती किंवा वरीलप्रमाणे अर्हता धारण करीत नसेल, परंतु विभागामध्ये कनिष्ठ अभियंता म्हणून नियमित आस्थापनेवर १० वर्षाची अखंड सेवा धारण करणाऱ्या व्यक्तीला पात्रतेच्या अधीन राहून ज्येष्ठतेच्या तत्वावर योग्य व्यक्तीला दर्जा देऊन शाखा अभियंता (स्थापत्य) पदाचा दर्जा देण्याबाबतची तरतूद आहे.

२/- शासनाकडील गृहनिर्माण विभागाच्या दि.०३.१२.२०२० रोजीच्या अधिसूचनेनुसार सोबतच्या प्रपत्रामधील कनिष्ठ अभियंत्यांना सदर अधिसूचनेनुसार शाखा अभियंता वर्ग-२ चा दर्जा व सुधारित वेतनश्रेणी देण्यास या आदेशान्वये मान्यता देण्यात येत आहे. संबंधित कनिष्ठ अभियंत्यांना नियमानुसार त्याचा लाभ देण्यात यावा.

३/- या आदेशामुळे करावा लागणारा अतिरिक्त खर्च, ज्या लेखाशिर्षाखाली संबंधित कनिष्ठ अभियंत्यांचे वेतन दिले जात होते, त्या शिर्षाखाली खर्ची घालावा व त्याची तरतूद सुधारित अंदाजपत्रकात करण्यांत यावी.

४/- प्राधिकरणाच्या दि.२० जानेवारी १९८७ च्या आदेशात नमूद केल्याप्रमाणे शासनाच्या पाटबंधारे विभागाच्या दि.१६.०४.१९८४ रोजीच्या शासन निर्णयामधील परिच्छेद-१ [६] अनुसार कनिष्ठ अभियंत्यांसाठी असलेली कर्तव्ये, जबाबदा-या व अधिकार शाखा अभियंता वर्ग-२

यांच्यासाठी तूर्त लागू राहणार आहेत. त्याचप्रमाणे ७ व्या वेतन आयोगानुसार वेतनस्तर **एस-१५ रु ४१८००-१३२३००** असा राहील.

५/- प्राधिकरणाच्या उक्त आदेशान्वये शाखा अभियंता पदाची दर्जोन्नती देण्यात आली असल्याने निम्न संवर्गातील पदावर कार्यरत असलेल्या कर्मचारी यांचे वेतन महाराष्ट्र नागरी सेवा [वेतन] नियम १९८१ मधील नियम क्र.१५ अन्वये वरच्या संवर्गातील वेतनस्तरा मध्ये निश्चित करण्यात यावे. वेतननिश्चिती करताना निम्न संवर्गातील कर्मचारी वरच्या संवर्गातील वेतनस्तरामध्ये वेतन घेत असल्यास तेच वेतन कायम ठेवण्यात यावे.

६/- आदेशासोबतच्या प्रपत्र-१ व २ मध्ये नमूद केलेल्या कनिष्ठ अभियंत्यांच्या नेमणूकीची तारीख संबंधित कनिष्ठ अभियंत्यांच्या सेवापुस्तकावरुन बिनचूक आहे, याची खात्री करुन घ्यावी व त्या तारखेत तफावत अथवा चूक आढळून आली तर तसे प्राधिकरणास कळविण्यात यावे, म्हणजे त्याबाबतीत सुधारीत आदेश काढणे सुलभ होईल.

७/- संबंधित कनिष्ठ अभियंत्यांने प्राधिकरणाच्या सेवेचा राजीनमा दिल्यास, सदर कनिष्ठ अभियंत्यांना सुधारित वेतनश्रेणीचा लाभ देण्यात येऊ नये.

८/- संबंधित कनिष्ठ अभियंते हे प्राधिकरणाच्या अस्थायी नियत आस्थापनेवर कार्यरत आहेत, तसेच त्यांच्याविरुध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी प्रलंबित अथवा प्रस्तावित नाही, यासंबंधी खातरजमा संबंधित कार्यालयाकडून यापूर्वी करुन घेण्यात आली आहे. तथापि, सुधारित वेतनश्रेणीचा लाभ देताना संबंधितांबाबत कांही नवीन घडामोडी झाली असल्यास त्याबाबत पुन्हा तपासणी करावी, याबाबतची जबाबदारी संबंधित कार्यालयावर राहील, याची नोंद घ्यावी.

९/- **संबंधित अभियंत्यांनी दि.३१/३/२०२३ रोजीचे विहित विवरणपत्रात मत्ता व दायित्वे भरुन दिल्याची खात्री करुन घेतल्याखेरीज संबंधित अभियंत्यांना शाखा अभियंता वर्ग-२ चा दर्जा देण्याबाबतचे आदेश हस्तांतरीत करण्यात येऊ नयेत. तसेच, आदेश हस्तांतरीत करण्यापूर्वी सदर अधिकाऱ्यांनी मत्ता व दायित्वे सादर केल्याचा अहवाल प्राधिकरणास सादर करावा.**

**मा. उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा. यांचे मान्यतेने.**
**सोबत- प्रपत्र १**

(राजकुमार सागर)
सचिव / प्राधिकरण

**प्रति,**
**सर्व संबंधितांना विभाग प्रमुखांमार्फत**

**प्रत सस्नेह अग्रेषित :**

१) मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ, मुं.इ.दु.व पु.मंडळ
२) मुख्य अभियंता-१, २, ३/प्रा.
३) वित्त नियंत्रक/प्रा.
४) मुख्य अधिकारी / मुं.झो.सु.मं.,
५) मुख्य लेखाधिकारी / मुं.झो.सु.मं.,
६) मा.व सं.तं.कक्ष/प्रा. (संकेतस्थळावर प्रसिध्द करणेकरीता)

**प्रत:** प्रशासकीय अधिकारी, प्रा/ मुं.झो.सु.मं मंडळ

**प्रत माहितीसाठी :-**

**प्रत**: प्रशासन- ६,९,१०,११,१२,१३,/प्रा.

**प्राधिकरणाच्या दि.                                  क्र.प्राधि/शा.अ.द./२०२३/            /प्र.७, या**
**क्रमांकाच्या शाखा अभियंता दर्जा व सुधारित वेतनश्रेणी देण्याबाबतच्या आदेशाचे प्रपत्र-१**

| अ क्र | कनिष्ठ अभियंत्यांचे नांव [स्थापत्य] | मंडळाचे नांव | दर्जा दिल्यानंतरचे कार्यालय | नेमणुकीचा दिनांक | शाखा अभियंता दर्जा व सुधारित वेतनश्रेणी मिळाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री पी.व्ही.घुटे | मुं झो सु मंडळ | मुं झो सु मंडळ | २८.१०.२०१४ | २८.१०.२०२१ |
| २ | श्री डी.आर.जगताप | मुं झो सु मंडळ | मुं झो सु मंडळ | २८.१०.२०१४ | २८.१०.२०२१ |

(राजकुमार सागर)
**सचिव / प्राधिकरण**

ICT/A